नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकासाशी संबंधीत सवलत करारनाम्यांना मुद्रांक शुल्कातून सूट देणे तसेच गौण खनिजावर आकारण्यात येणारे स्वामित्वधन अदा करणेपासून सूट देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः सिआयडी-३३१७/२०४०/प्र.क्र.२८९/नवि-१०

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०४ जुलै, २०१९

<u>संदर्भ</u>:- १. सिडकोचे पत्र क्र.सिडको/एमडी/एनएमआयए/०५१, दि.१५.१२.२०१७
२. सिडको पत्र क्र.सिडको/व्हीसी ॲन्ड एमडी/२०१८/३५७, दि.४.४.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाशी संबंधीत निविदा टप्प्यातील प्रारुप दस्तऐवजांना व करारनाम्याला राज्य मंत्रिमंडळाच्या दि.७.४.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूरी देताना विमानतळाच्या विकासाशी संबंधीत केवळ जमीन हस्तातरणाच्या पहिल्या दस्तांना मुद्रांक शुल्कातून सुट देण्यास मान्यता दिली आहे. यास्तव महसूल व वन विभागाने दि.३०.५.२०१६ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. सदर अधिसूचनेनुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील अनुच्छेद क्र.२५ (अभिहस्तांतरण) व ३६ (भाडेपट्टा) या तरतूदीखाली येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकासाशी संबंधीत निष्पाधीत केलेल्या पहिल्या संलेखावरील आकारणी योग्य मुद्रांकशुल्क माफ करण्यात आले आहे.

तथापि, उक्त अधिसूचनेमध्ये मुद्रांक अधिनियमामधील अनुच्छेद क्र. ५ व ३६-ए उपबंधाचा उल्लेख करण्यात आला नसल्याने सिडकोने संदर्भित क्र.१ वरील पत्रानुसार प्रस्ताव सादर केला होता. तसेच सद्यस्थितीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाशी संबंधीत पूर्व विकास कामासाठी आकारण्यात येणारे स्वामित्वधन महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा), २०१५ मधील तरतूदीनुसार अदा करण्यापासून सूट देण्याची विनंती सिडको महामंडळाने संदर्भीत क्र.२ च्या दि.४.४.२०१८ च्या पत्रान्वये केली होती.

यास्तव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संबधीत जमीन हस्तांरणाच्या पहिल्या दस्तांना मुद्रांक शुल्कातून सूट देणे व विमानतळाच्या विकास कामांसाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदीनुसार स्वामित्वधनापासून सूट देणे याबाबत दि.०४.०६.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर विकसीत करण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या विकासासाठी सवलत करारनाम्यांना मुद्रांक शुल्कातून सूट देणे तसेच गौण खनिजावर आकारण्यात येणारे स्वामित्वधन अदा करणेपासून सूट देण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

अ. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकासाशी संबंधित सिडको व सवलतधारक यांच्या दरम्यानच्या सवलत करारनाम्यावरील मुद्रांक शुल्काबाबत महसूल व वन विभागाने दि.३०.५.२०१६ रोजी निर्गमीत केलेल्या अधिसूचनेव्दारे अनुच्छेद क्र.२५ व अनुच्छेद क्र.३६ नुसार आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे.

जमीन हस्तांतरणासाठी सवलत करारनाम्यांशिवाय इतर कोणतेही भाडेपट्टा करारनामे होणार नसल्याने, सिडको व सवलतधारक यांच्या दरम्यानच्या उक्त सवलत करारनाम्यावरील पहिल्या दस्ताऐवजांना महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची क्र.१ मधील अनुच्छेद क्र. ५(एच)(ए)(VI) व ३६(ए) नुसार आकारणी योग्य असलेल्या मुद्रांक शुल्कातून कलम ९ नुसार सूट देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ब. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी सिडको करत असणाऱ्या उत्खननामधून निघणारे खडक, मुरुम, इत्यादी स्वरुपातील गौण खनिजांचा वापर केवळ सिडको परिसरातील सिडको/शासनाच्या अन्य प्रकल्पांमध्ये उपयोग करण्यासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१७ अंतर्गत नियम ४६ च्या परंतूकानुसार सिडको महामंडळाला स्वामित्वधन अदा करण्यापासून १०० टक्के सूट देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, या संदर्भातील निविदा प्रक्रिया झाली असल्यास निविदेतील अटी- शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०४१६३९५०४८२५ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRAM DATTATRAYA YADAV

Digitally signed by SHRIRAM DATTATRAYA YADAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9da0e03bd84c1e17d78ad320814d003150fbf7d2abd36f924e5705145bf0e270, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=50cb0ce4cc4fe54c74f42b860354e86ec00b3b36f5f215c9f7658e611006a200, ou=URBAN DEVELOPMENT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRAM DATTATRAYA YADAV
Date: 2019.07.12 12:37:39 +05'30'

(श्रीराम यादव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.

३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई
८. व्यवस्थापकीय संचालक,शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको), निर्मल, दुसरा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१.
९. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.
१०. महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, मुंबई
११. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई/ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, रायगड.
१५. निवड नस्ती (नवि-१०).